MHCO080003482025

<u>न्यायाधीश, सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी मु. अलिबाग यांचे न्यायालयात</u>

( पिठासीन अधिकारी श्रीमती. एम. ए. साळी )

सीसी/आरटीएन/२४५/२०२५

राजवैभव नागरी सहकारी पतसंस्था मर्या खेड, **वादी**
प्रधान कार्यालय, खेड, रजि. नं. आर.टी.जी./
के.एच.डी./आरएसआर/सी.आर४६६/०७—०८
छत्रपती शिवाजी चौक, खेड, जि. रत्नागिरी
तर्फे शाखाधिकारी श्री. स्वप्निल गणपत नरळकर
वय — ३८ वर्षे, धंदा— नोकरी
व्दारा राजवैभव नागरी सहकारी पतसंस्था मर्या खेड
छत्रपती शिवाजी चौक, खेड, जि. रत्नागिरी

**विरुद्ध**

१) श्री. समिना मन्सूर माखजनकर **प्रतिवादी**
वय — ४६ वर्षे, धंदा— टेलरिंग
रा. मु. पो. मुरडे मोहल्ला खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी
२) श्री. फकिर महमद बागवान
वय — ६० वर्षे, धंदा— व्यापार
मु. पो. भोस्ते जलाल शहा मोहल्ला खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी
३) श्री. मन्सूर यासीन माखजनकर
वय — ४८ वर्षे, धंदा— हॉटेल
रा. मु. पो. मुरडे मोहल्ला खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी

**<u>दावा रक्कम रू.२,५९,७९३/—</u>**

वादीतर्फे वकिल :— ॲड. के. एस. पाटणे
प्रतिवादी क्र. १ ते ३ :— एकतर्फा

## <u>न्यायनिर्णय</u>

**(घोषित दिनांक ०३.०८.२०२६ रोजी)**

१. वादी संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाचे कलम ९१

नुसार दाखल केलेल्या प्रस्तुत विवादानुसार विवादातील प्रतिवादींकडून रक्कम रू.२,५९,७९३/— ची मागणी केलेली आहे.

**<u>वादी संस्थेचे दाव्यातील कथन खालीलप्रमाणे आहे.</u>**

२. वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्थाचा अधिनियम १९६० अन्वये नोंदलेली सहकारी संस्था आहे. प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. १ हे कर्जदार असून प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १ यास दावा कर्जासाठी जामीनदार आहेत. प्रतिवादी क्र. १ ने मागणी केल्यानुसार वादी संस्थेने त्यास रक्कम रू.१,००,०००/— चे कर्ज द.सा. द.शे. १६.५ टक्के इतक्या व्याजदराने मंजूर केले होते/आहे. सदरील कर्जाची रक्कम प्रतिवादीने दिनांक ०४/०१/२०१९ रोजी घेतले. विवादीत कर्जाची स्विकृती व परतफेडी बाबत प्रतिवादींनी वैयक्तीकपणे वादी संस्थेच्या हक्कात कर्जमागणी अर्ज, कर्ज स्विकृतीपत्र, कर्जरोखा, करारपत्र, प्रतिज्ञापत्र, सततचे हमीपत्र, वचनचिठ्ठी, कर्जरोखा, व अशी इतर अन्य कागदपत्र करून दिलेली आहेत. वादी संस्थेच्या म्हणण्यानुसार कर्ज फेडीची जबाबदारी सर्व प्रतिवादींची वैयक्तिक व संयुक्तिक स्वरूपाची आहे.

३. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादींनी ठरल्याप्रमाणे कर्ज परतफेड करण्यामध्ये कसुर केलेला आहे. वादी संस्थेने प्रतिवादींना रक्कम परतफेडीबाबत वेळोवेळी लेखी व तोंडी विनंती केली. परंतु प्रतिवादींनी प्रतिसाद दिलेला नाही. त्या अनुषंगाने वादी संस्थेने शेवटी वकिलामार्फत

प्रतिवादींना कर्ज रक्कम परतफेडी बाबत नोटीसा दिल्या. तरी देखील प्रतिवादींनी सदर नोटीसींना उत्तर दिले नाही अथवा त्यातील मागणी नुसार परतफेड केली नाही. म्हणून सदरची प्रतिवादी कडून येणे असलेली रक्कम वसुल होवून मिळावी म्हणून वादी संस्थेस सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे. वादी संस्थेने विवादातील सर्व प्रतिवादी कडून विवादातील रक्कम रू.२,५९,७९३/— वैयक्तिक व संयुक्तीकपणे वसुल होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादींना दावा समन्स काढण्यात आले होते. सर्व प्रतिवादींना समन्सची बजावणी झाली आहे/होती. परंतु प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना दाव्याचे समन्स लागुन देखील ते गैरहजर राहीले आहेत. सबब प्रतिवादी क्र. १ ते ३ विरूध्द दावा एकतर्फा चालावा म्हणून हुकूम केले गेले आहेत.

५. वादी संस्थेने तिची केस सिध्द करण्यासाठी म्हणून साक्षीदार या नात्याने वादी संस्थेचे प्रतिनिधी स्वप्निल गणपत नरळकर, यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. वादीचे साक्षीदाराने त्याची साक्ष शपथपत्राव्दारे दिलेली आहे. वादीचे दाव्यात ज्या बाबी नमुद केल्या गेलेल्या आहेत त्या सर्व बाबी वादीचे साक्षीदाराने त्याचे पुराव्याचे शपथपत्रात समाविष्ट केलेल्या आहेत. वादीचे साक्षीदाराने दिलेल्या तोंडी पुरावा प्रतिवादीकडून आव्हानित केला गेलेला नाही. प्रतिवादी हे दाव्याचे कामी गैरहजर राहिलेले आहेत. त्यांनी वादीचे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याचा प्रयत्न केलेला नाही. म्हणून

वादीचे साक्षीदाराने दिलेला पुरावा नाकारण्यास माझया मते काही एक कारण नाही. वादी संस्थेने तिच्या साक्षीदाराच्या तोंडी पुराव्याने दावा कर्ज प्रकरणाची सर्व कागदपत्र म्हणजेच कर्जमागणी अर्ज, कर्जरोखा, वचनचिठ्ठी शाबीत केलेली आहेत.

६. प्रतिवादीकडून रक्कम रू.२,५९,७९३/— येणे आहेत ही बाब शाबीत करण्यासाठी वादी संस्थेने प्रतिवादी क्र. १ च्या कर्ज खात्याचा उतारा दाखल केला आहे. कर्ज खातेउतारा योग्यरित्या शाबीत झालेला आहे. परंतु कर्जखातेउता—याचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, प्रतिवादीकडून वादी संस्थेस एकूण रक्कम रू.२,५९,७९३/— येणे असल्याचे बाकी आहे. प्रतिवादींनी सदर दर्शविण्यात आलेल्या येणे रकमेबाबत वाद उपस्थित केलेला नाही. परंतु खातेउता—यामध्ये वादी संस्थेने वसुलीखर्च, विमाखर्च, नोटीसखर्च व इतर खर्चापोटी रक्कम रू.२७,७०२/— आकारलेली दिसते. सदर रकमेबाबत वादीने कोणताही पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. सबब वसुलीखर्च व इतर खर्च रक्कम वगळता वादी संस्था प्रतिवादीकडून रक्कम रू.२,३२,०९१/— मिळणेस पात्र असल्याचे वादी संस्थेने सिध्द केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच मुद्दल रकमेवर कर्ज व्यवहाराचा ठरलेला व्याज दर १६.५ टक्के एवढा आहे. हे कर्जरोखा आणि वचनचिठ्ठी या कागदपत्रांवरून सिध्द झालेले आहे. प्रतिवादीची कर्जफेडीची जबाबदारी वैयक्तिक व संयुक्तीक आहे. त्या बद्दल देखील दुमत

असण्याचे काही एक कारण नाही. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) वादीचा विवाद खर्चासहीत अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी वादी संस्थेस वैयक्तिक व संयुक्तिकरित्या रक्कम रू.२,३२,०९१/—(अक्षरी रूपये दोन लाख बत्तीस हजार एक्क्याण्णव फक्त) द्यावेत. तसेच संपूर्ण निवाडा रक्कम फिटेपर्यंत मुद्दल रक्कम रू.९०,२६५/— (अक्षरी नव्वद हजार दोनशे पासष्ट फक्त) वर दि.०१/१०/२०२५ पासून पुढील व्याज द.सा. द.शे. १६.५ टक्के व्याजदराने द्यावे.

३) येणे प्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

अलिबाग.
दिनांक ०३.०८.२०२६

( श्रीमती एम. ए. साळी )
न्यायाधीश,
सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी
मु. अलिबाग.

# हुकूमनामा

**<u>न्यायाधीश, सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी मु. अलिबाग यांचे न्यायालयात</u>**

( पिठासीन अधिकारी श्रीमती. एम. ए. साळी )

सीसी/आरटीएन/२४५/२०२५

राजवैभव नागरी सहकारी पतसंस्था मर्या खेड, **वादी**
प्रधान कार्यालय, खेड, रजि. नं. आर.टी.जी./
के.एच.डी./आरएसआर/सी.आर४६६/०७—०८
छत्रपती शिवाजी चौक, खेड, जि. रत्नागिरी
तर्फे शाखाधिकारी श्री. स्वप्निल गणपत नरळकर
वय — ३८ वर्षे, धंदा— नोकरी
व्दारा राजवैभव नागरी सहकारी पतसंस्था मर्या खेड
छत्रपती शिवाजी चौक, खेड, जि. रत्नागिरी

**विरुद्ध**

१) श्री. समिना मन्सूर माखजनकर **प्रतिवादी**
वय — ४६ वर्षे, धंदा— टेलरिंग
रा. मु. पो. मुरडे मोहल्ला खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी
२) श्री. फकिर महमद बागवान
वय — ६० वर्षे, धंदा— व्यापार
मु. पो. भोस्ते जलाल शहा मोहल्ला खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी
३) श्री. मन्सूर यासीन माखजनकर
वय — ४८ वर्षे, धंदा— हॉटेल
रा. मु. पो. मुरडे मोहल्ला खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी

दिनांक २८/११/२०२५ रोजी दाखल केलेल्या वरील वादाचा दि.०३/०८/२०२६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, चे कलम ९६ अन्वये दिलेल्या निकालाप्रमाणे प्रस्तुत वाद खालीलप्रमाणे निकाली करणेत येत आहे.

१) वादीचा विवाद खर्चासहीत अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी वादी संस्थेस

वैयक्तिक व संयुक्तिकरित्या रक्कम रू.२,३२,०९१/—(अक्षरी रूपये दोन लाख बत्तीस हजार एक्क्याण्णव फक्त) द्यावेत. तसेच संपूर्ण निवाडा रक्कम फिटेपर्यंत मुद्दल रक्कम रू.९०,२६५/— (अक्षरी नव्वद हजार दोनशे पासष्ट फक्त) वर दि.०१/१०/२०२५ पासून पुढील व्याज द.सा. द.शे. १६.५ टक्के व्याजदराने द्यावे.

३) शिवाय प्रतिवादींनी तपशिलाप्रमाणे दावा खर्च रक्कम रु.५७६९/— वादीला दयावी व स्वत:चा खर्च स्वत: सोसावा.

| अ.क्र. | खर्चाचा तपशिल | वादी | प्रतिवादी |
|---|---|---|---|
| १ | कोर्ट फी स्टॅम्प | रु.३४५०/— | —— |
| २ | वकील फी | रु.२२१४/— | रु.२२१४/— |
| ३ | सेवा शुल्क | रु.१०५/— | —— |
| **एकूण रुपये** | | रु.५७६९/— | रु.२२१४/— |

(एकूण अक्षरी रुपये पाच हजार सातशे एकोनसत्तर मात्र)

आज दि.०३.०८.२०२६ इ. रोजी हा निवाडा माझे सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला आहे.

अलिबाग.
दिनांक ०३.०८.२०२६

(श्रीमती एम. ए. साळी )
न्यायाधीश,
सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी
मु. अलिबाग.